१९९६ – २०२२ (वर्ष २६)

**कै. श्री. मु.ब.यंदे पुरस्कार**
**कल्पना एक आविष्कार अनेक (एकूण वर्ष ३६)**

महोदय/महोदया,
स.न.वि.वि.

उपरोक्त संस्थेतर्फे "कल्पना एक आविष्कार अनेक" **(वर्ष १९ वे)** राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**प्राथमिक फेरी, शनिवार/रविवार ०१ आणि ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी,** सकाळी १०:०० वाजल्यापासून (तालीम स्वरूपात) पु. ल. देशपांडे कला अकादमी, (४ था मजला, रिहर्सल हॉल ("वाद्यसंगीत हॉल") प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात येईल. जर अतिरिक्त प्रवेशिका वाढल्या, तर त्यांची प्राथमिक फेरी दोन गटात घेण्यात येईल. या संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार आयोजकांकडे राहील. स्पर्धेची **अंतिम फेरी, शनिवार ०८ ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न होईल.**

प्रवेश अर्जासोबत **रु. १५००/-** (प्रवेश शुल्क), **शुक्रवार ३० सप्टेंबर २०२२ रोजीच,** प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे कला अकादमी, (४ था मजला, रिहर्सल हॉल ("वाद्यसंगीत"), प्रभादेवी, मुंबई, **सायंकाळी ०५:३० ते ०८:०० पर्यंतच** स्वीकारले जातील. अपूर्ण आणि उशिरा आलेल्या प्रवेशिका अपात्र होतील आणि कुठल्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाही. स्पर्धेचे ड्रॉ त्याच दिवशी सायंकाळी ०७:४५ वाजता काढण्यात येतील. ड्रॉ साठी सदर स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

सदर स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यात आपण निश्चितपणे सहकार्य कराल, असा विश्वास आहेच.

**धन्यवाद!**
**आपला स्नेहाभिलाषी**
**"अस्तित्व"**
**स्पर्धेसाठी संपर्क: +९१ ९०८२६३३२८८**



*माझ्या आजवरच्या जगण्यातून मला हे सांगावस वाटतंय कि "भूक" या एका जाणिवेने मला इथवर यायला भाग पाडले आहे. भूक ही फक्त पोटाची असत नाही. ती प्रेमाची, नात्याची, सोबतीची, ज्ञानाची, कुठलीही असू शकते. पण ती जेव्हा पूर्ण होत नाही तेव्हा वाट्याला जी करावीशी येते ती मी सहन केली आहे आणि माझ्या सोसण्यातूनच मला जगण्याचे बळ मिळाले आहे. मला असं वाटतंय कि आपल्या कल्पना एक आविष्कार अनेक या उपक्रमातून "भूक" या जाणिवेकडे जमेल तितक्या कोनातून बघितलं जावं... साकार केला जावं. आपल्या उपक्रमास माझ्या अनेकानेक शुभेच्छा आहेतच!*

*आपलीच माई - सौ. सिंधुताई सपकाळ*

**कल्पना सूचक: कै. पद्मश्री सिंधूताई सपकाळ (माई)**
**कल्पना: " भूक "**

**स्पर्धेचे नियम:**

- **प्राथमिक फेरी, शनिवार/रविवार ०१ आणि ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी, सकाळी १०:०० वाजल्यापासून (तालीम स्वरूपात) पु. ल. देशपांडे कला अकादमी, (४ था मजला, रिहर्सल हॉल ("वाद्यसंगीत हॉल") प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात येईल. जर अतिरिक्त प्रवेशिका वाढल्या, तर त्यांची प्राथमिक फेरी दोन गटात घेण्यात येईल. या संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार आयोजकांकडे राहील. स्पर्धेची अंतिम फेरी, शनिवार ०८ ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न होईल.**
- **प्रवेश अर्जासोबत रु. १५००/- (प्रवेश शुल्क), शुक्रवार ३० सप्टेंबर २०२२ रोजीच, प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे कला अकादमी, (४ था मजला, रिहर्सल हॉल ("वाद्यसंगीत"), प्रभादेवी, मुंबई, ०५:३० ते ०८:०० पर्यंतच स्वीकारले जातील. अपूर्ण आणि उशिरा आलेल्या प्रवेशिका अपात्र होतील आणि कुठल्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाही. प्रवेश आकार कोणत्याही कारणास्तव परत दिला जाणार नाही. स्पर्धेचे ड्रॉ त्याच दिवशी सायंकाळी ०७:४५ वाजता काढण्यात येतील.**
- लॉट्स/ड्रॉ पध्दतीने एकांकिका सादरीकरणाचे क्रम ठरविण्यात येतील. ड्रॉ साठी सदर स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी. मात्र **६० किमी पेक्षा जास्त अंतरावरून** येणा-या संघांच्या सादरीकरणासाठी क्रम राखून ठेवण्याचा अधिकार आयोजकांकडे राहिल. ज्या संघाचे प्रतिनिधी हजर नसतील त्या संघाच्या सादरीकरणाचा क्रम बदलण्याचा अधिकार स्पर्धा समितीला असेल. स्पर्धक संघांना आपला नाट्यप्रयोग समिती ठरवेल त्या क्रमाने वा दिवशी विनातक्रार सादर करावा लागेल.
- अपूर्ण/चुकीची माहिती असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही. प्रवेश अर्ज स्वीकारण्याचे सर्वाधिकार आयोजकांना असतील.
- एकांकिका / संहिते ला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळाले असले पाहिजे. सदर प्रमाणपत्राची एक प्रत, एकांकिकेच्या दोन प्रती, लेखकाच्या परवानगीचे मूळपत्र अर्जासोबत देणे आवश्यक आहे.
- सादर करण्याची तारीख, क्रम व वेळ ड्रॉ पद्धतीने ठरविण्यात येईल. प्रवेश पत्रिका अपूर्ण असल्यास, तिचा विचार केला जाणार नाही.
- स्पर्धा समिती ठरवेल त्या दिवशी, वेळी आणि क्रमानुसार, स्पर्धक संस्थेला आपला नाट्यप्रयोग विनातक्रार सादर करावा लागेल.
- एकांकिकेचा कालावधी किमान ३५ मिनिटे व कमाल ४० मिनिटे असणे बंधनकारक राहिल. आधीच्या एकांकिकेचे नेपथ्य काढून प्रकाशयोजनेसाठी कमाल २० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. या नियमाचे पालन करण्यासाठी विशेषत: नेपथ्यकार व प्रकाशयोजनाकार यांनी विचार करावा अशी अपेक्षा आहे.
- स्पर्धेत सादर झालेल्या एकांकिकेच्या यापूर्वी प्रयोग झाल्याची तक्रार आल्यास आणि तपासाअंती तसे सिद्ध झाल्यास, परीक्षकांच्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल. परीक्षक मंडळाने दिलेला निर्णय हा अंतिम निर्णय समजला जाईल. तसेच सदर एकांकिकेचा निकाल राखून ठेवणे किंवा पारितोषिक परत घेण्याचे निर्णय आयोजक समितीला राहील.
- स्पर्धेच्या वेळेचे बंधन पाळणे प्रत्येक स्पर्धक संस्थेस बंधनकारक राहिल. स्पर्धक संस्थेने नियोजित सादरीकरणाच्या वेळेपूर्वी किमान ०१ तास आदी उपस्थित असणे बंधनकारक राहिल.
- प्राथमिक फेरी तालीम स्वरूपात होईल. अंतिम फेरीसाठी आयोजक संस्थेतर्फे **"विनामूल्य" १२ स्पॉट** (स्पॉटचे लोकेशन बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही), नेपथ्यासाठी **०८ ठोकळे, ०४ x ९' (इंच) / ०४ x १८' (इंच) प्लॅटफॉर्म**, एकांकिकेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. खास प्रकारचे नेपथ्य अगर प्रकाशयोजना असल्यास ती जबाबदारी स्पर्धक संस्थेची असेल.
- सर्वसाधारण रंगभूषेसाठी (अंतिम फेरी) आयोजन संस्थेतर्फे मेकअप व्यवस्था करण्यात येईल. विशेष रंगभूषेची आवश्यकता असल्यास त्याचा खर्च स्पर्धक संस्थेला करावा लागेल.
- स्पर्धकांना एकांकिका सादरीकरणादरम्यान कोणत्याही प्रकारचे श्राव्य किंवा दृक-श्राव्य चित्रण करण्याची अनुमती असणार नाही. जर कोणी स्पर्धक असे करताना आढळल्यास त्यांना अपात्र करण्यात येईल.
- मुंबई व मुंबई बाहेरील संस्था या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील परंतु मुंबई बाहेरीलच्या कोणत्याही संस्थेला प्रवासखर्च देण्यात येणार नाही.
- कोणताही स्पर्धक (अभिनेता / अभिनेत्री) कलावंतास एकाच एकांकिकेसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची अनुमती राहिल.
- एकांकिका स्पर्धेचे परीक्षक नेमण्याचा अधिकार आयोजक संस्थेस असेल. परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धक संस्थास बंधनकारक राहील.
- **एकांकिकेची संहिता पूर्णपणे नवीन असून या पूर्वी सदर संहितेचा / एकांकिकेचा कोठेही प्रयोग झालेला नसल्याचे लेखकाचे प्रमाणपत्र संहिते बरोबर देणे गरजेचे आहे.**
- बॅकस्टेजला गर्दी टाळावी या हेतूने अंतिम फेरीत सादरीकरण करणाऱ्या संघांनी फक्त ०१ तास आधी नाट्यगृहात दाखल व्हायचे आहे. सादरीकरण झाल्याबरोबर त्यांनी लगेचच बॅकस्टेजमधून निघून जायचे आहे. स्पर्धेच्या ठिकाणी विषारी, तंबाखूजन्य, मद्य किंवा अवैध पदार्थ आणू नयेत.
- नाट्यगृहपरिसरात सोशल डिस्टन्सिंगचे उल्लंघन करून कुठल्याही प्रकारची गर्दी/ संघ बैठक/ मोठा जमाव करण्यास परवानगी नाही.
- **एकांकिकेत / साहिंतेत विषय सूचक, आयोजक, अथवा कोणत्याही व्यक्तीचा, सामाजिक अथवा राजकिय संस्थेचा उलेख कटाक्षाने टाळण्यात यावा. स्पर्धेत सादर होणा-या प्रयोगात नग्नता, बीभत्सता, स्पष्ट लैंगिक गतिविधी यांचा समावेश नसावा तसेच धार्मिक भावना, जाती जमातीवर टीका टिपण्णीचा समावेश नसावा किंवा गोपनीयताचे उल्लंघन नसावे किंवा अवैध, अनैतिक तसेच सार्वजनिक हिताच्या विरुद्ध कोणतेही घटक समाविष्ट नसावेत.**
- **कार्यक्रमात व नियमात फेरफार करण्याचा अधिकार स्पर्धा समितीकडे राहील. या संबंधी कोणतीही कारणे देण्यात येणार नाही.**

# प्रवेश अर्ज

- संस्थेचे / महाविध्यालयेचे नाव : ______________________
- एकांकिकेचे नाव : ______________________
- लेखकाचे नाव : ______________________
- दिग्दर्शकाचे नाव : ______________________
- संस्था प्रतिनिधीचे नाव : ______________________
- दूरध्वनी / मोबाइल क्रमांक : ______________________
- ई मेल : ______________________
- डी.आर.एम. क्रमांक : ______________________
- एकांकिकेचा सारांश : ______________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

प्राचार्य / संस्था अध्यक्ष
सही व शिक्का

आयोजक
अस्तित्व/चार मित्र, कल्याण

| | |
|---|---|
| प्रवेश अर्ज | |
| संहितेची ०२ प्रती | |
| सेन्सॉर बोर्ड ची प्रत | |
| प्रवेश फी | |
| लेखकाची परवानगी | |